Annexure - 8.

26

21

महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००९/६९६/प्र.क्र.३१/२००९/का.१, दिनांक :- २ मे, २००९.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्यूकेशन सोसायटी, मुंब्रा पोलीस स्टेशनच्या मागे, मुंब्रा, जि. ठाणे या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२७.९.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. दि.२.४.२००९ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/ प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या भाषिक (हिंदी) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामतः सदर संस्था ही **भाषिक (हिंदी)** अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला **भाषिक** अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी.एफ. थेकेकरा

( टी. एफ. थेकेकरा )
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग महाराष्ट्र शासन

College of Education THANE Mumbra

S.T.C. - 35 90/(2245)

42

महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसटीसी-३५९०/(२२४५)/विशि-५
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: 25 जाने. १९९०.

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

विषय: सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून अध्यापक महाविद्यालये उघडण्यास परवानगी.

महोदय

सन १९९०-९१ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता [illegible] विचार करून महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी या संस्थेला १९९०-९१ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जांवर मुंबई विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ५७(७) व (५) अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- |
| मुंब्रा, जि. ठाणे | अध्यापक महाविद्यालय |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवर आहे :-

१. सदर महाविद्यालयास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

२. संस्थेने विद्यापीठाकडे ३० नोव्हें. १९८९ पूर्वी नवीन अध्यापक महाविद्यालय सुरू करण्याकरिता अर्ज केलेला असावा. तसा अर्ज न केल्यास विद्यापीठाकडे इतर कोणत्याही संस्थेकडून सदर ठिकाणासाठी अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यासाठी विद्यापीठास अर्ज प्राप्त झालेला नसावा.

[क्र. पा. प.]

...२/..

Received on 31/1/1990

I/c PRINCIPAL
M.C.E.S.' College of
Education & Research,
Mumbra ... 400 612 Dist. Thane

M.C.E.S. College of Education ... THANE

३. सदर महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ८० प्रवेश व दरवर्षी प्रति विद्यार्थ्यांस सदर महाविद्यालयात रु.२५००/- शिक्षणशुल्क आकारतील. विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्तींचे सदर प्रस्तावक महाविद्यालयाकडून पालन करण्यात यावे. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ५३[६] व [७] नुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

यासाठी प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ द. रा. माजी ]

सहायक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे

२] प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान ]
मुंबई विभाग, मुंबई

३] सचिव, महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी

४] निवड नस्ती.